सेवा संकल्प अभियानाच्या कालावधीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीस गती देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सेसंअ-२०२६/ई-१८५०६७१/योजना-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक: १६ सप्टेंबर, २०२६**

वाचा :-१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : सेसंअ-२०२६/प्र.क्र.९५/रवका-२ दि.०९.०९.२०२६

२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२,ई-११२३०५७/यो-११ दि.०६.०८.२०२५.

**प्रस्तावना:-**

आपल्या देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संदर्भ क्र. १ अन्वये **दि.१७ सप्टेंबर २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर २०२६** या कालावधीत राज्यामध्ये "**सेवा संकल्प अभियान**" राबविण्यात येत आहे. सदर अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, लोकसहभाग वाढविणे, ग्रामस्तरावर लोकाभिमुख उपक्रम राबविणे तसेच विकासकामांना गती देणे अपेक्षित आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चित करण्यात आलेल्या विविध बाबींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सेवा संकल्प अभियानाचा कालावधी विशेष कृती कालावधी म्हणून उपयोगात आणून ग्रामपंचायत स्तरावर विविध लोकाभिमुख व सेवाभावी उपक्रम राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

**१.** दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी "सेवा संकल्प ग्रामसभा" दि.१७ सप्टेंबर २०२६ रोजी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये "सेवा संकल्प ग्रामसभा" आयोजित करण्यात यावी. सदर ग्रामसभेमध्ये सेवा संकल्प अभियानाची उद्दिष्टे व स्वरूप याबाबत ग्रामस्थांना माहिती देणे, नागरिकांना उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सेवा व योजनांची माहिती देणे, ग्रामपंचायतीतील प्राधान्याच्या विकासकामे व स्थानिक गरजांबाबत चर्चा करणे, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन करणे, महिला बचत गट, युवक, ग्रामस्तरीय समित्या, लोकप्रतिनिधी व नागरिकांचा सक्रिय सहभाग निश्चित करणे, याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

## २. सप्ताहनिहाय कृती आराखडा:-

सेवा संकल्प अभियानाच्या कालावधीत ग्रामपंचायतींनी खालीलप्रमाणे सप्ताहनिहाय उपक्रमांना प्राधान्य द्यावे.

### २.१ पहिला सप्ताह -सुशासन व नागरिक सेवा:-

या सप्ताहात नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यावर विशेष भर देण्यात यावा. यामध्ये आपले सरकार केंद्रामार्फत उपलब्ध सेवा, विविध दाखले व प्रमाणपत्रे, जन्म-मृत्यू नोंदणी, आयुष्मान भारत कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्रे, विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे तसेच पात्र नागरिकांना उपलब्ध करून देता येणाऱ्या इतर शासकीय सेवा व योजनांचा लाभ देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी. ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित नागरिक सेवा व कामांचा शक्य तितका निपटारा करण्यात यावा.

### २.२ दुसरा सप्ताह -संस्था व सार्वजनिक सुविधांचे सक्षमीकरण:-

या सप्ताहात **शाळा, अंगणवाडी, स्मशानभूमी तसेच इतर सार्वजनिक संस्थांच्या मूलभूत सुविधांच्या सक्षमीकरणावर** विशेष भर देण्यात यावा. स्थानिक गरजेनुसार पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, स्वच्छता, संरक्षण भिंत, परसबाग, आवश्यक दुरुस्ती इत्यादी कामे हाती घेऊन त्यांना गती देण्यात यावी. यासाठी उपलब्ध शासकीय योजना, निधी, स्थानिक संसाधने व लोकसहभाग यांचे प्रभावी अभिसरण करण्यात यावे.

### २.३ तिसरा सप्ताह-जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव:-

या सप्ताहात **जलसंधारण, जलस्रोत स्वच्छता, स्वच्छता व पर्यावरण संवर्धन** यावर विशेष भर देण्यात यावा. यामध्ये जलस्रोतांची स्वच्छता, जलसंधारणाची कामे, पाणीपुरवठा व नळजोडण्यांशी संबंधित आवश्यक कार्यवाही, घनकचरा व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत.

### २.४ चौथा सप्ताह- आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण व उपजीविका:-

या सप्ताहात **आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण व उपजीविका** यासंबंधीच्या उपक्रमांना विशेष प्राधान्य देण्यात यावे. यामध्ये आरोग्य तपासणी शिबिरे, पोषण व ॲनिमियाबाबत जनजागृती, महिलांचे आरोग्य व स्वच्छता, महिला बचत गटांचे सक्षमीकरण, महिला शेतकरी उत्पादक संस्था तसेच महिला व नागरिकांच्या आर्थिक सक्षमीकरणाशी संबंधित उपक्रम राबविण्यात यावेत.

**३. प्रत्येक सप्ताहात "गावासाठी एक दिवस" - श्रमदान व लोकसहभाग :-**

सप्ताहनिहाय उपक्रमांव्यतिरिक्त प्रत्येक सप्ताहात किमान एक दिवस ग्रामवस्ती अथवा सार्वजनिक ठिकाणी श्रमदान व लोकसहभागाचा उपक्रम आयोजित करण्यात यावा. ग्रामस्थ, महिला बचत गट, युवक मंडळे, ग्रामस्तरीय समित्या, स्थानिक संस्था व लोकप्रतिनिधी यांच्या सहभागातून गावाच्या स्थानिक गरजेनुसार स्वच्छता, जलस्रोत स्वच्छता, शाळा/अंगणवाडी परिसर सुधारणा, वृक्षसंवर्धन, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत.

**सदर श्रमदान केवळ औपचारिक स्वरूपाचे न राहता गावाच्या प्रत्यक्ष गरजेशी संबंधित व दृश्यमान परिणाम निर्माण करणारे असावे.**

४. "One GP- One Visible Change"

वरील सप्ताहनिहाय उपक्रमांपासून **स्वतंत्रपणे**, सेवा संकल्प अभियानाच्या संपूर्ण कालावधीत प्रत्येक ग्रामपंचायतीने "One GP-One Visible Change" या संकल्पनेनुसार नागरिकांना प्रत्यक्ष दिसून येईल असा **किमान एक ठोस, सकारात्मक व शक्यतो शाश्वत बदल** ग्रामपंचायतीमध्ये घडवून आणावा.

सदर उपक्रमाची निवड ग्रामपंचायतीने **स्थानिक गरज, उपलब्ध संसाधने, लोकसहभाग व अपेक्षित परिणाम** यांचा विचार करून करावी.

"One GP- One Visible Change" **साठी सुचविलेले उपक्रम :-**

रक्तदान शिबिर, अनाथालय / वृद्धाश्रम भेट, वृक्षारोपण अभियान, स्वच्छता ही सेवा, आरोग्य तपासणी शिबिर, एक गाव दत्तक घ्या-सेवा कार्य, योग व ध्यान सत्र, प्लास्टिक-मुक्ती जनजागृती, महिलांचे आरोग्य व स्वच्छता, वंचित मुलांसाठी शिक्षण सहकार्य, करिअर कौन्सिलिंग सत्र, ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता, अवयवदान संकल्प अभियान, व्यसनमुक्त भारत जनजागृती, पोषण व ॲनिमिया जनजागृती, रस्ते सुरक्षा जनजागृती, जलसंधारण व जलस्रोत स्वच्छता, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, सायबर सुरक्षा जनजागृती, फिट इंडिया खेळ सत्र, वीर गाथा व सैनिकांचा सन्मान, दिव्यांगजन सहकार्य उपक्रम, मतदार जागरूकता व नोंदणी, वोकल फॉर लोकल सहकार्य, सरकारी योजनांची जागरूकता, विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी सर्व प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम.

वरील उपक्रमांची यादी उदाहरणादाखल असून, ग्रामपंचायतीस स्थानिक गरजेनुसार अन्य नाविन्यपूर्ण व लोकाभिमुख उपक्रमही हाती घेता येतील. "One GP-One Visible Change" उपक्रमासाठी प्रत्येक पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

५. गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतींना उपक्रमाची निवड, नियोजन व अंमलबजावणीबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे. आवश्यकतेनुसार संबंधित विभाग, शासकीय योजना, स्थानिक संस्था व लोकसहभाग यांचे अभिसरण साधावे. तसेच, प्रत्येक ग्रामपंचायतीने राबविलेल्या उपक्रमाची छायाचित्रे, लघु व्हिडिओ/रील्स व संक्षिप्त माहिती संकलित करून नोंद ठेवावी. शक्य असल्यास उपक्रमापूर्वी व उपक्रमानंतरची Before-After documentation ठेवण्यात यावी.

उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती तालुका व जिल्हास्तरावर संकलित करून त्यांचा इतर ग्रामपंचायतींमध्ये प्रसार करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

६. **अधिकाऱ्यांची जबाबदारी आणि क्षेत्रीय सहभागः-**

६.१ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी **प्रत्येक सप्ताहात किमान २ ग्रामपंचायतींना भेट** द्यावी. या भेटीदरम्यान अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांशी संवाद साधावा तसेच आवश्यक मार्गदर्शन करावे.

६.२ गटविकास अधिकाऱ्यांनी **प्रत्येक सप्ताहात ३ ते ४ ग्रामपंचायतींना भेट** द्यावी. सदर भेटी केवळ पाहणी किंवा तपासणीपुरत्या मर्यादित न ठेवता ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट, युवक व ग्रामस्थांसाठी Awareness-cum-Learning Sessions आयोजित करावेत. या माध्यमातून सुशासन, नागरिक सेवा, संस्था सक्षमीकरण, जलव्यवस्थापन, स्वच्छता, हरित ग्राम, आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण, उपजीविका, लोकसहभाग व योजनांचे अभिसरण इत्यादी विषयांवर प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात यावे.

६.३ जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील सर्व संबंधित अधिकारी यांनी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी किमान एक ग्रामपंचायत दत्तक घेऊन सदर ग्रामपंचायतीच्या अभियानातील उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी नियमित मार्गदर्शन, समन्वय व आवश्यक सहकार्य करावे.

६.४ अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय यांनी सेवा संकल्प अभियानाबाबत आपल्या विभागाचे नोडल अधिकारी म्हणून काम पहावे. त्यांनी अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांचे समन्वय, संनियंत्रण व पर्यवेक्षण करावे. तसेच, सदर अभियानाच्या अंमलबजावणीचा दर सप्ताहास आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना वेळोवेळी निर्गमित कराव्यात.

गटविकास अधिकाऱ्यांनी अभियानांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे छायाचित्रे, लघु व्हिडिओ/रील्स व संक्षिप्त माहिती आपल्या विभागाच्या अपर आयुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय यांच्याकडे सादर करावी.

सदर प्राप्त माहितीचे संकलन, संनियंत्रण व आवश्यक छाननी करून अपर आयुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय यांनी अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या उल्लेखनीय उपक्रमांचे छायाचित्रे, व्हिडिओ/रील्स व संक्षिप्त अहवाल शासनास सादर करावा.

७. **लोकसहभाग व योजनांचे अभिसरण:-**

अभियानातील उपक्रमांमध्ये **महिला बचत गट, युवक, स्वयंसेवी संस्था, ग्रामस्तरीय समित्या, स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी** यांचा सक्रिय सहभाग घेण्यात यावा. आवश्यकतेनुसार विविध शासकीय योजनांचा निधी, उपलब्ध संसाधने, योजनांचे अभिसरण, CSR तसेच लोकसहभाग व श्रमदान यांच्या माध्यमातून उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१६११२७१७७८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.09.16 13:35:11 +05'30'

**(प्रशांत पाटील)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. राज्यपाल, यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधामंडळ, मुंबई,
८. मा. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, अपर मुख्य
११. सचिव/प्रधान सचिव/सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,
१५. मुंबई, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,

१६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३. महालेखापरिक्षक (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१,२, मुंबई/नागपूर,
२४. महालेखापरिक्षक (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य-१,२, मुंबई/नागपूर,
२५. विभागीय आयुक्त, सर्व,
२६. जिल्हाधिकारी, सर्व,
२७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
२८. कार्यासन योजना-११ संग्रहार्थ.